**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

# अमरावती कृषि हवामान सल्ला

**मंगळवार दिनांक – १८.१०.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १९ ते २३ ऑक्टोबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १९/१० | २०/१० | २१/१० | २२/१० | २३/१० |
| पाऊस (मिमी) | २ | १ | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३१ | ३० | २९ | ३० |
| किमान तापमान (अं.से.) | २२ | २१ | २० | १९ | २० |
| ढग स्थिती (आकाश) | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८७ | ९१ | ९३ | ९१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ६८ | ७८ | ८५ | ७५ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| वा-याची दिशा | १०१ | १४५ | ७५ | १३२ | ३७ |

| हवामानाचा इशारा | सध्यस्थितीत जिल्ह्यात दिनांक १९-२० ऑक्टोबर रोजी हवामान कोरडे राहील तसेच २१-२३ ऑक्टोबर रोजी काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे | |
|---|---|---|
| **पिकांचे नाव** | **अवस्था** | **कृषि हवामान सल्ला** |
| सर्व पिक | वाढ | मुंग व उडीद पिकाचे शेत खाली झाले असल्यास रब्बी पिकासाठी लगेच तयार ठेवावे व नियोजनानुसार रब्बी पिकाची पेरणी करावी. |
| कपाशी | पात्या/बोंड | कपाशी मध्ये कोळपणी, खुरपणी, आंतरमशागत करुन जमीन भुसभुशीत ठेवावी तसेच पिके तणमुक्त ठेवावीत. सद्यस्थितीत पिकावर बोंड अवस्थ्येत बोंड व पात्ये गळ रोखण्यासाठी पिकास २ टक्के डीएपी अधिक ४ मी.ली प्लानोफ़िक्स ( २०० ग्रम डीएपी + १० लिटर पाणी ) १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>तसेच पिकावर बोंड अवस्थ्येत (लाल्या रोग) पाने लाल पडण्याची लक्षणे दिसताच मग्नेशीयम सल्फेट २० ते २५ किलो प्रती हेक्टरी झाडाच्या मुळाशी देणे किवां ५० ते १०० ग्रॅम मग्नेशीयम सल्फेट अधिक १०० ग्रॅम युरिया प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br><br>कपाशीवर मावा, तुडतुडे, फुलकिडे व पांढरी माशी या किडींनी आर्थिक नुकसानाची संकेत पातळी गाठताच पिकावर ५ % निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी किवां वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना पर्यावरणनिष्ठ व्यवास्थापनासाठी मेटारायझीयम अनिसोपली ५० ग्रॅम (२ x १०$^{८}$ CFU) ग्रॅम किंवा ब्यूव्हेरिया बॅसीयाना १.१५ टक्के (२ x १०$^{८}$ CFU) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी किंवा ब्रुप्रोफेजीन २५ टक्के २० मि.लि किंवा डायफेनययूरॉन ५० टक्के भुकटी १२ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. कपाशी पिकात पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनाकरीता हेक्टरी ८ ते १० पिवळे चिकट सापळे लावावेत. कपाशीवर गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाचे निदान करण्यासाठी पात्या व फुले लागण्याच्या अवस्थेत वेळोवेळी निरक्षण करावे. बोंडे लागण्याच्या अवस्थेत एक एकर क्षेत्रातून वेगवेगळ्या झाडांची २० बोंडे तोडून ती फोडून पहावीत. खाली गळून पडलेली प्रादुर्भावग्रस्त पात्या, फुले व बोंडे गोळा करून त्वरित नष्ट करावीत व आर्थिक नुकसानाची संकेत पातळी गाठताच पिकावर ५ % निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी. किंवा बीटी कपाशीमध्ये रेफुजी झाडावर ५ टक्के प्रमाणावर गुलाबी बोंड अळी दिसून येताच व फुलामध्ये प्रादुर्भाव ५ टक्के पर्यंत आढळून आल्यास क्वीनॉलफॉस २५ टक्के ए एफ २५ मि.लि क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही २५ मि.लि प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. प्रादुर्भाव ५ ते १० टक्के पर्यंत आढळून आल्यास थायोडिकार्ब ७५ टक्के भुकटी २० ग्रॅम किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ टक्के १० मि.लि प्रती १० लिटर पाणी |

| | | |
|---|---|---|
| | | या प्रमाणे फवारणी करावी. पिकावर फवारणी करण्या अगोदर पावसाचा अंदाज घावा मग फवारणी करावी. |
| सोयबीन | कापणी | सोयाबीन पिकाची पाने पिवळी पडून गळू लागतात व शेंगांचा रंग तांबूस काळसर होतो. त्यावेळेस पिक काढणी करिता तयार झाले असे समजावे. कापणीचे वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ ते १७ टक्के असावे. कापणी नंतर पिक ताबडतोब खळ्यावर ठेवावे तसेच काढलेल्या पिकाची पावसापासून संरक्षण करावे. सोयाबीनचे पिक संकरीत पिक नसल्यामुळे पुढील हंगामातील पेरणी साठी स्वत: तयार केलेले बियाणे वापरता येते. मात्र त्यासाठी सोयाबीनची मळणी करतांना मळणी यंत्राच्या ड्रमची गती ३५०-४०० फेरे ( आर.पी.एम ) प्रती मिनिट पेक्षा जास्त नसावी. यापेक्षा गती जास्त असल्यास बियाण्याच्या उगवण शक्तीवर परिणाम होतो. साठवणूक करतांना बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के पेक्षा जास्त नसावे. यासाठी बियाणे उन्हात वळवून तागाच्या पोत्यात भरावे. बियाण्याची उगवण शक्ती कमी होऊ नये यासाठी आ कावर एक ४-५ पोतेच रचावेत तसेच बियाण्यास आदळआपट करू नये. साठवणुकीची जागा स्वच्छ व कोरडी असावी. पिक काढणी अगोदर आपल्या स्तानिक वातावरण व पावसाचा अंदाज घावा. |
| तूर | वाढ | पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी, तसेच गरज पडल्यास निंदण करून तणनियंत्रण करावे. पिकावरील पाने खाणा-या अळ्यांचा नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी व सोबतच शेतात कामगंध सापळे लावावे, |
| उडीद | कापणी | उडीद पिकाची मळनि करून व तयार झालेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. |
| रब्बी पिके | पेरणी | रब्बी पिकामध्ये ओलीत करडी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास भीमा, एकेएस -२०७, पिकेव्ही - पिंक, किंवा नारी -६ या वाणची निवड करावी व पेरणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात पर्यंत करावी. रब्बी पिकामध्ये रब्बी ज्वारी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास मालदांडी, फुले यशोदा, पिकेव्ही - क्रांती, या वाणां ची निवड करावी व जवस पिकासाठी वाण पिकेव्ही - एनएल २६० ची पेरणी या आठवड्यात संपवावी. पेरणीस उशीर झाला तर मुरमाशी ( खोडमाशी) चा प्रादुर्भाव होण्याची शक्याता असते व त्यामुळे झाडांची योग्य ते संख्या मिळत नाही. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.<br>ओलित हरभरा साठी जाकी ९२१८, विजय, पिडीकेव्ही कांचन ची पेरणी शेवटच्या आठवड्यात पर्यंत करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबियम व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. . |
| फळझाडे | वाढ/परिपक्वता | आंबिया बहरतील संत्रा फळे तोडणीस आले असल्यास फळे तोडणीचे १५ दिवस अगोदर पाणी देणे बंद करावे. अंबिया बहरातील फळे काढणीच्या १५ दिवस अगोदर कार्बेन्डेंजिम* ०.१% (१०) ग्रॅम १० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी. यामुळे फळे वाहतुकीत सडण्याचे प्रमाण कमी होते. फळे तोडतांना शक्यतो फळाला ५ मिमी देठ ठेवावा. बागेमध्ये आच्छादानाचा वापर करावा. मृग बहारातील फळांची वाढ वेगाने होण्याकरिता जिब्रेलिक ॲसिड १५ पीपीएम + मोनो-पोटॅशियम फॉस्फेट १%(१किलो) १०० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी.<br>झाडावर पानांची संख्या कमी व पाने पिवळट हिरव्या रंगाची असल्यास कैल्शियम अमोनियम नायट्रेट १% (१ किलो) + जिब्रेलिक ॲसिड १५ पीपीएम + कार्बेन्डेंजिम १०० ग्रॅम + १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>बुरशीजन्य फळगळ कमी करण्याकरिता कॉपर ऑक्सीक्लोराइड ३० ग्रॅम किवां कार्बेन्डेंजिम १० ग्रॅम + १० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी. |
| भाजीपाला | लागवड | मिरची पिकावरील शेंडेमर (डाय-बेक) व फळसड रोगाच्या नियत्रणाकरिता डायफेनकॉनाझोल २५ ईसी ५ मिली १० लिटर पाण्यात किवां अझोक्सोस्त्रोबीन २३% एस सी १० मिली किवां बेनोमिल ५० % डब्लूपी ४ ग्राम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. लवकर व उशिरा येणारा करपा रोगाच्या नियत्रंनाकरिता अझोक्सोस्त्रोबीन २३% एससी, १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.. |
| पशु व पक्षी | | जनावरांचे बाह्य परजीवी पासून रक्षण करण्यासाठी जनावरांना खरारा करावा, यामुळे शरीरावरील बाह्य परजीवी गळून पडतात त्वचा चमकदार दिसते. गोठ्याच्या फटीत हे बाह्य परजीवी लपून बसतात |

| | | |
|---|---|---|
| | | त्यामुळे गोठ्याच्या काण्याकोपऱ्यात शिफारशीत गोचीड नाशकाची फवारणी करावी आणी फवारणी करताना गोठ्यात जनावरे नसावीत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.